bluebytes
news that matters

**Thursday, September 02, 2010**

**Smokefree Mumbai joins hands with Ganesh Mandals**

Publication: Mumbai Mitra, Edition: Mumbai, Journalist: Bureau, Page No: 3, Location: Middle-Left, Width(cms): 9, Height(cms): 10, Size(sq.cms): 90

# गणेशोत्सवाच्या माध्यमातून तंबाखू विरोधात मोहिम

**मुंबई दि.१ :** अतिसार अशा तंबाखू सेवनाने आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांबाबत लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे ही सध्याच्या काळाची गरज झाली आहे. ही बाब लक्षात घेता दहा दिवस चालणाऱ्या गणेश उत्सवाच्या निमित्ताने १ ते १० सप्टेंबर रोजी बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव सहकार समितीच्या साहाय्याने स्मोक फ्री मुंबई कॅम्पतर्फे एका विशिष्ट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा चार प्रकारात आधारित असून यात प्रामुख्याने मंडळांच्या आराशीचा विषय / संकल्पना, तंबाखू मुक्तीविषयीच्या फलकांचा वापर, उत्सवा दरम्यान तंबाखू नियंत्रणाशी संबंधीत विशेष उपक्रम आणि प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या तंबाखू सेवनास उदयुक्त करणाऱ्या जाहिरातीचा अभाव यांचा यात समावेश आहे. या स्पर्धेत १२,००० मंडळांमधून जो सगळ्यात प्रभावी संदेश देईल त्या मंडळाला २५,००० चे प्रथम पारितोषिक देण्यात येईल. तर दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकासाठी अनुक्रमे १५,००० व १०,००० चे पारितोषिक ठेवण्यात आले आहे.

या उत्सवादरम्यान गणेश मंडळे मोठा जनसमुदाय आकर्षित करतात आणि म्हणूनच तंबाखू सेवनाच्या दुष्परिणामांची लोकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी हे एक मोठे व्यासपीठ आहे. अशी माहिती टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या ऑन्कोलॉजी विभागाचे प्रमुख आणि स्मोक फ्री मुंबई म ोहिमेचे प्रमुख डॉ. शास्त्री यांनी दिली.